शालार्थ प्रणालित नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष कृती दल स्थापन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
शासन शुध्दीपत्रक क्र. शालार्थ १११८/प्र.क्र. ३०/१८/टीएनटी-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- २२ मे, २०१८

संदर्भ :-१) शासनाचा समक्रमांक दिनांक २८.२.२०१८ रोजीचा शासन निर्णय.
२) आयुक्त शिक्षण, शिक्षण आयुक्तालय, पुणे यांचे क्र. शिआ/२०१८/विकृद/बैठक/ आस्था क १४४/१४५२, दिनांक ९.३.२०१८ रोजीचे पत्र.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन क्र. १ च्या शासन निर्णयातील परिच्छेद क्र. २ वगळण्यात येत असून त्याऐवजी,

"२ (अ) शिक्षण संचालक, माध्यमिक व उच्च माध्यमिक यांच्याकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावांची संख्या विचारात घेऊन शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) व अध्यक्ष (महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद) यांच्याकडे सदर प्रस्तावांची विभागणी करण्यात यावी. शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), शिक्षण संचालक (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) व अध्यक्ष (महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद) यांनी त्यांच्याकडे प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करुन प्रस्ताव विशेष कृती दलास सादर करावेत.

ब) प्रलंबित प्रस्तावांवर विशेष कृती दलाने दिनांक १५.६.२०१८ पर्यंत निर्णय घ्यावा. तसेच वेळोवेळी सादर होणाऱ्या प्रस्तावांवर नियमितपणे कार्यवाही करावी.

क) निर्णय घेण्यात आलेल्या प्रस्तावांमधील कर्मचाऱ्यांचे नाव शालार्थ प्रणालीमध्ये Online समाविष्ट करण्याची कार्यवाही शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), पुणे यांनी करावी," असे वाचावे.

३. सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०५२२१७४२१२२४२१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Charushila D Chaudhari

Digitally signed by Charushila D Chaudhari
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b99d7dca0e63be1bd1b7158b9523537dcc1d46bc807768647a9ed4ff3816ecf3, cn=Charushila D Chaudhari
Date: 2018.05.22 17:41:06 +05'30'

(चारुशीला चौधरी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१ मा. मंत्री (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग) यांचे खाजगी सचिव
२ आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
३ शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्य), महाराष्ट्र राज्य, पुणे
४ शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे
५ शिक्षण संचालक (अल्पसंख्यांक व प्रौढ शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे
६ अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे
७ श्री. सुनिल मगर, अध्यक्ष, ई गव्हर्नन्स सेल, पुणे
८ श्री. राजेंद्र गोधणे, सहसंचालक, आयुक्त शिक्षण यांचे कार्यालय, पुणे
९ श्री. राजु गुल्हाणे, अधिक्षक (सा.रा.से.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे
१० श्री. नरेश पाटील, अधिक्षक (सा.रा.से.), माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालनालय, पुणे
११ अध्यक्ष/सचिव, महाराष्ट्र राज्य कनिष्ठ महाविद्यालयीन महासंघ, मुंबई
१२ विभागीय शिक्षण उप संचालक, सर्व
१३ शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक) सर्व
१४ शिक्षण निरीक्षक (उत्तर/दक्षिण/पश्चिम), मुंबई
१५ प्रशासन अधिकारी, शिक्षण प्रमूख म.न.पा. /न.पा. सर्व
१६ अधिक्षक, वेतन व भविष्य निर्वाह निधी पथक (प्राथमिक/माध्यमिक) सर्व
१७ सर्व कार्यासने, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
१८ निवड नस्ती, टीएनटी/३, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई